| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २४३ वा | बुधवार दिनांक १० डिसेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### निष्काळजीपने अग्नी प्रज्वलीत करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलनेली माहिती अशी की, सार्वजनिक रस्त्याचेकडेला हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत कणाऱ्यांवर शिराढोण पोलीसांनी दि. ०८ डिसेंबर रोजी कारवाई केली. ग्रामस्थ-सत्तार अब्दुल शेख, वय ५२ वर्षे, खामसवाडी ता.कळंब जि. धाराशिव, विजय प्रभाकर सावंत, वय ३९ वर्षे, रा. खामसवाडी ता.कळंब जि. धाराशिव यांनी जिल्हा परिषद शाळे समोर व येथे विजयराज जिलेबी सेंटरच्या पुढे खामसवाडी येथे आपल्या हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत करुन पदार्थ तयार करत असताना शिराढोण पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरध्द भा.न्या. सं. कलम- २८७ अन्वये शिराढोण पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

### गळ्यातील सोन्याचे गंठन चोरले

धाराशिव(प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी स्वाती पृथ्वीराज सस्ते, वय ४८ वर्षे, रा. पदमीनी निवास २७/७११ रामनगर २४ नंबर शाळेजवळ धाराशिव ता. जि.धाराशिव या दि.०७.१२.२०२५ रोजी आठवडी बाजार धाराशिव येथे भाजीपाला घेत असताना अज्ञात व्यक्तीने स्वाती सस्ते यांचे गळ्यातील सोन्याचे गंठन अंदाजे २,६८,५३४ किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- स्वाती सस्ते यांनी दि.०८.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोबाईलची चोरी

धाराशिव(प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुवर्णा महेश सानप, वय ३७ वर्षे, रा. देशपांडे स्टॅन्डच्या पाठीमागे धाराशिव ता. जि.धाराशिव यांचा अंदाजे २०,९९९ किमतीचा व्हीओ मोबाईल फोन हा दि.२५.११.२०२५ रोजी देशपांडे स्टॅन्ड येथील इरफान शेख यांचे साउंडच्या दुकानातुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सुवर्णा सानप यांनी दि.०८.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संतोष राजेंद्र दुधभाते, वय ३० वर्षे, रा. वडगाव लाख ता. तुळजापूर जि.धाराशिव यांची अंदाजे ५०,००० किंमतीची मोटरसायकल रेस्ट हाउसचे ऑफिसचे समोर तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस तपास करीत आहेत.

## धाराशिवमध्ये तरुणाची आत्महत्या!



धाराशिव(प्रतिनिधी)- सोलापूर जिल्ह्यातील बार्शी आणि बीड जिल्ह्यातील गेवराई येथे नर्तिकेच्या नादातून युवकाने आपले जीवन संपवल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. आता धाराशिवमध्ये कला केंद्रातील महिलेसोबत प्रेमसंबंधातून वाद झाल्याने एका तरुणाने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या बाबत समजलेली माहिती अशी की, अश्रुबा कांबळे असे या युवकाचे नाव असल्याचे समजते..

अश्रुबा कांबळे आणि नर्तिका दोघेही देवदर्शनासाठी एकत्र गेले होते. तिथून परत आल्यानंतर दोघांमध्ये किरकोळ वाद झाला आणि पुढे हा वाद चिघळला. यातूनच अश्रुबा या तरुणाने टोकाचे पाऊल उचलले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच नर्तिकेच्या नादात बीड जिल्ह्यातील युवकाने आपले आयुष्य संपवले होते.

या घटनेबाबत अधिकची माहिती अशी की, धाराशिव येथील साई कला केंद्रात नृत्य काम करणाऱ्या महिलेचा आणि तिच्या प्रियकराचा वाद झाला होता. या वादात अश्रुबा अंकुश कांबळे (२५) या तरुणाने आत्महत्या करण्याची धमकी दिली होती. धमकी दिल्याच्या काही वेळातच या तरुणाने गळफास घेत आत्महत्या केली.

अश्रुबा कांबळे रुई ढोकी गावचा रहिवाशी असून गेल्या ५ वर्षापासून कला केंद्रातील नर्तिका आणि त्याच्यात अनैतिक प्रेम संबंध असल्याचे समजते. मृत तरुण आणि तरुणी शिखर शिंगणापूर येथे काल देवदर्शनाला गेले, देवदर्शन करून परतत असताना दोघांमध्ये वाद झाला. देव दर्शन करून येत असताना मृत प्रियकराच्या बायकोचा फोन आला म्हणून नर्तिका आणि अश्रुबा यांच्यात वाद झाल्याची माहिती समोर आली आहे.

दोघांमध्ये वाद सुरू झाल्यावर अश्रुबा याने आत्महत्या करण्याची धमकी दिली आणि तो तिथून निघून गेला. नर्तिकेने त्याच्या या धमकीकडे दुर्लक्ष केले. मात्र, काही वेळातच अश्रुबाने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. या नंतर धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा व शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांकडे सोपवण्यात आला आहे. तसेच या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी महिलेला ताब्यात घेतले असून तिची चौकशी केली जात आहे असे समजते.

## १२ ते १८ डिसेंबरदरम्यान क्रीडा सप्ताह ; विविध क्रीडा स्पर्धा

धाराशिव,दि.९ डिसेंबर (जिमाका) राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना होऊन जनतेमध्ये क्रीडाविषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षीप्रमाणे जिल्हास्तरावर क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार १२ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून त्या अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता श्रीपतराव भोसले हायस्कूल येथे क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन होणार आहे.त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे स्केटिंग व कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे कराटे स्पर्धा तसेच सायंकाळी ५ वाजता गांधी विद्यालय, चिखली,ता.जि.धाराशिव येथे कबड्डी स्पर्धा होणार आहे.१४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

१५ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे १०० मीटर,२०० मीटर धावणे व चालणे स्पर्धा तसेच सकाळी १० वाजता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे आर्चरी स्पर्धा होणार आहे.१६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता तालुका क्रीडा संकुल,कळंब येथे आट्या-पाट्या स्पर्धा तर सायंकाळी ६ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे तायक्कांदो स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

१७ डिसेंबर रोजी श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे सकाळी ९ वाजता तलवारबाजी स्पर्धा तसेच सायंकाळी ५ वाजता जिम्नॅस्टिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.१८ डिसेंबर रोजी क्रीडा सप्ताहाचा समारोप सायंकाळी ५ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे होणार आहे.

या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम,धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.तसेच जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

## नॅचरल शुगर ऊस पिकासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा (एआय) जास्तीत जास्त वापर करणारा राज्यातील पहिला कारखाना-बी.बी. ठोंबरे



कळंब (प्रतिनिधी)- नॅचरल शुगर एड अलाईड इंडस्ट्रीज लि. रांजणी या कारखान्याचे कार्यक्षेत्रामध्ये ऊस पिकासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञान (एआय) चा वापर करणेसाठी पहिल्या हवामान केंद्राची उभारणी पुर्ण करून त्याचा शुभारंभ जिल्हा कृषि अधिकारी श्री राजकुमार मोरे, यांचे शुभ हस्ते व कृषिरत्न श्री. बी. बी. ठोंबरे, संस्थापक अध्यक्ष नॅचरल उद्योग समुह यांचे अध्यक्षतेखाली आणि तालुका कृषि अधिकारी श्री सरडे यांचे उपस्थितीत दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडला.

यावेळी बोलताना कृषिरत्न ठोंबरे म्हणाले, शेतक-यांचे ऊस पिक उत्पादन वाढविणेसाठी ग्रीकल्चर ट्रस्ट बारामती, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, पुणे, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन पुणे यांचे सयुक्त विद्यमाने ऊस पिकासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञान (एआय) चा वापर करण्यासाठी आम्ही एकूण ७०० शेतक-यांची निवड केली असून त्याची नोंदणी पुर्ण झाली आहे. त्यामधील पहिल्या हवामान केंद्राचा शुभारंभ आज झालेला आहे. या हवामान केंद्राद्वारे जमिनीतील आद्रता, पिकाला पाण्याची गरज, हवामानाचा अंदाज, पिकाला खताची गरज व कीड व्यवस्थापन इत्यादिची माहिती मराठी भाषेमध्ये आपल्या मोबाईलवर मिळणार आहे. अशा एकूण २६ हवामान केंद्राची उभारणी केली जाणार आहे. एका केंद्राच्या २.५ किलो मिटर चारही बाजुचे शेतक-यांना याचा फायदा होणार आहे. सध्या आपण प्रायाेगित तत्वावर ३५ गावामध्ये एआय वापराची सुरूवात केलेली आहे. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून कांही शेतक-यांनी ११८ ते १५० टन प्रति एकरी ऊस उत्पादन घेतले आहे. यामध्ये २५ टक्के खर्चात बचत होणार असून ३५ टक्के उत्पादनात वाढ मिळणार आहे. मात्र शेतक-यांनी दररोज शेतात जाऊन मोबाईलवर आलेल्या सल्ल्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. नॅचरल शुगर हा राज्यात सर्वात जास्त एआयचा वापर करणारा कारखाना ठरला आहे. येत्या ५ वर्षात कारखाना कार्यक्षेत्रातील संपूर्ण क्षेत्रावर एआय तंत्रज्ञानाचा वापर करणार असल्याचेही ते म्हणाले.

या प्रसंगी बोलताना राजकुमार मोरे म्हणाले, नॅचरल शुगरने शेतक-यांना केंद्र बिन्दू मानून कार्य केल्यामुळे आज नॅचरलची उल्लेखनीय प्रगती झालेली आहे. एआय सारख्या नविन तंत्रज्ञानाचा फायदा कारखाना कार्यक्षेत्रातील शेतक-यांना व्हावा म्हणून कारखान्याने मोठया संख्येने या योजनेमध्ये शेतकरी सहभाग नोंदवला आहे. शासकिय स्तरावरून येणा-या विविध योजना देखील आम्ही नॅचरल शुगरचे माध्यमातून जास्तीत जास्त शेतक-यांना देण्याचा प्रयत्न करणार आहोत. शेतक-यांनी एआय तंत्रज्ञान वापरताना त्यांनी दिलेल्या सल्ल्याचा तंतोतंत वापर करून आपले उत्पादन वाढवावे असेही त्यांनी सांगीतले.

सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन व प्रास्तावीक कारखान्याचे संचालक कृषिभूषण पांडूरंग आवाड यांनी केले आणि श्री अशोक गुजर ऊस विकास व्यवस्थापक यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, शेतकरी सभासद, कारखान्याचे अधिकारी आणि कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२५: संकलन शुभारंभ कार्यक्रम १९ डिसेंबर रोजी

धाराशिव (जिमाका) दि.९ डिसेंबर : दर वर्षीप्रमाणे ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून साजरा केला जातो.यावर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ कार्यक्रम १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट संकलनाबाबत मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार असून वीरपत्नी, वीरमाता,वीरपिता यांचा सत्कार, तसेच माजी सैनिकांना आर्थिक मदतीचे धनादेश वाटप केले जाणार आहे.त्याचबरोबर विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा देखील सत्कार करण्यात येणार आहे.

माजी सैनिक,वीरपत्नी,वीरमाता, वीरपिता व त्यांचे अवलंबित यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

## अपघात व वित्तहानी टाळावी म्हणून निवेदन सादर



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव यांच्यावतीने धाराशिव बेंबळी महामार्गावर सतत होणाऱ्या अपघात होऊन जीवित व वित्तहानी होत आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी बॅरिकेट्स उभारावे, स्पीड ब्रेकर उभा करावे, रस्त्यावर दिशादर्शक फलक बसवावे, वाहतूक पोलीस कर्मचारी नियुक्त करावे. यामुळे या दाट लोकवस्तीच्या भागात पुन्हा अपघात होणार नाहीत यासाठी मा अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव यांना निवेदन देण्यात आले. यालाच अनुसरण दुसरे एक निवेदन मा अधिष्ठाता मॅडम शासकीय वैद्यकीय आयुर्वेदिक रुग्णालय व महाविद्यालय धाराशिव यांना आयुर्वेदिक रुग्णालय/ महाविद्यालय येथे अपघात झालेल्या व इतर रुग्णावर प्राथमिक उपचार होणे बाबत निवेदन देण्यात आली त्यात धाराशिव शहरा मधून एक राष्ट्रीय महामार्ग व इतर महामार्ग जात असल्यामुळे या महामार्गावर कायम अपघात होत असतात.

अपघातग्रस्तांना तातडीची प्राथमिक आरोग्य सुविधा घेण्यासाठी सुद्धा शासकीय रुग्णालय येथे जावे लागते. शहरातील वाहतूक कोंडीमुळे बऱ्याच वेळा अपघातग्रस्तांचे जीव जाण्याचे प्रसंग घडत आहेत.

धाराशिव शहरातील अनेक नागरिकांनी व महामार्गावर प्रवास करणाऱ्या अनेक प्रवाशांनी आयुर्वेदिक रुग्णालयात ही सुविधा नसल्याची खंत बोलून दाखवल्यामुळे व राग व्यक्त केल्याने या महामार्गावर व इतर राज्य मार्गावर होणाऱ्या अपघातातील अपघातग्रस्तांना तातडीची प्राथमिक वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी शासकीय वैद्यकीय आयुर्वेदिक रुग्णालय मध्ये एक कॅज्युअल्टी विभाग २४ तास व एक वैद्यकीय अधिकारी कायम या ठिकाणी उपलब्ध करून द्यावा.

यावेळी समितीचे उपाध्यक्ष श्री हनुमंत यादव सचिव श्री आकाश भोसले शहराध्यक्ष श्री संतोष घोरपडे श्री हनुमंत तांबे श्री अमोल साळुंके, श्री योगेश आतकरे श्री रामानंद माडेकर, श्री प्रथमेश जगदाळे, श्री, अनंत झाडके, श्री व्यंकटेश पडिले उपस्थित होते.

## फेरीवाल्यांची भाविकांना मारहाण; १ जखमी

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-तुळजापूर मध्ये काठ्यावाल्यांनी भाविकांना बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी (दि. ८) सायंकाळी महाद्वारासमोर घडली. या बाबत समजलेली माहिती अशी की, यामध्ये एका भाविकाचा डोक्याला जबर मार लागून गंभीर जखमी झाला. या प्रकरणी एका काठ्यावाल्यांला ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान महाद्वार परिसरातील काठ्यावाले आणि फेरीवाल्यांचा दहशतीचा मुद्दा यामुळे चव्हाट्यावर आला असून, महाद्वार परिसरातील काठीवाले, फेरीवाले व बांगडीवाल्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी भाविकांनी केली.

हर्ष रमेश गडदे (वय १७, रा. इचलकरंजी) हा नातेवाइकांसह तुळजाभवानी मातेचा दर्शनासाठी आला होता. देवीदर्शनानंतर रात्री साडेसातच्या सुमारास राजे शहाजी महाद्वार परिसरात हातातले कडे खरेदी करताना त्यांचा काठीवाल्यासोबत वाद झाला. याचा राग धरून काठीवाल्यांचा जमावाने हर्ष गडदे व त्याचा सोबतचा नातेवाइकांना बेदम मारहाण केली. या वेळी हर्ष गडदेचा डोक्यात तेलाचा डबा घातल्याने डोके फुटले. तर सारिका तोटगी (रा. गोखाक, जि. बेळगाव) व सुरेखा गडदे (रा. माडगा ता. जत) यानांही मार लागला. या प्रकरणात अनिष धावारे (रा. मातंगनगर तुळजापूर) याला ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशीरापर्यंत सुरू होती. दरम्यान महाद्वार परिसरात काठीवाले, बांगडीवाल्यासह फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून रस्त्यावर दुकाने थाटली आहेत. अतिक्रमण हटवण्यास आलेल्या पालिका कर्मचाऱ्यांसह पोलिसांना ही काठिवाले, बांगडीवाल्यासह फेरीवाले जुमानत नसून अनेकदा पालिका कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली आहे. भाविकांना मारहाणीचा घटना यापूर्वी अनेक वेळा घडल्या आहेत, मात्र भाविक गुन्हा दाखल करण्यास धजावत नसल्याने मुजोरी वाढली. भाविकांना मारहाण करणाऱ्यावर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहून गुन्हे नोंदवण्याची मागणी नातेवाइकांनी केली.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत हज्जु रा. तालीम चौक भारत विद्यालयाचे बाजूला धाराशिव यांनी दि.०८.१२.२०२५ रोजी बावी गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जय भवानी हॉटेल समोर महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ लाल गोवा गुटखा, विमल पान मसाला, बादशाहा गुटखा, तंबाखु, डायरेक्टर पान मसाला, बजाज सिटी १०० मोटरसायकल सह एकुण ८३,६१० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला धाराशिव ग्रामीण पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# बाबासाहेबांची संपूर्ण विश्वात सिम्बॉल ऑफ नॉलेज ओळख

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यान

धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वामध्ये सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक व्यक्ती नसून, ज्ञानाचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन प्रा. महेंद्र चंदनशिवे यांनी केले आहे.

धाराशिव येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. चंदनशिवे बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख,सेवा निवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र धावारे, सेवा निवृत्त मुख्याध्यापक काशीनाथ वाघोलीकर व सेवानिवृत्त सुभेदार सिद्राम वाघमारे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी प्रा. चंदनशिवे म्हणाले, ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. त्या दिवशी एकूण १४९ देशाचे ध्वज खाली घेण्यात आले होते. माणसे धर्माने नव्हे तर स्वकर्तृत्वाने मोठी होत असतात. भारतातील चळवळीचे जनक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वामध्ये सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखले जातात. पुस्तकांसाठी त्यांनी घर बांधले, अभ्यासू, जिज्ञासू लोकांसाठी त्यांचे जीवन म्हणजे संशोधनाचा विषय आहे. प्रत्येक वेळी नवीन नवीन विचार आणि निष्कर्ष त्यांच्या अभ्यासातून निघतात. बाबासाहेबांना नऊ भाषा अवगत होत्या. यावरूनच त्यांचा व्यासंग लक्षात येतो. शिक्षणाचा उपयोग देश हितासाठी व समाज हितासाठी झाला पाहिजे हा प्रमुख विचार डॉ. बाबासाहेबांनी समाजासमोर मांडला. कोणत्याही विषयावर आधारित त्यांनी मूळ ग्रंथाची रचना केली, तरुणांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची साधना होण्याची गरज प्रा. चंदनशिवे यांनी या वेळी व्यक्त केली. प्रारंभी प्राचार्य देशमुख व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विवेकानंद चव्हाण, सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय साखरे तर आभार प्रा. माधव उगिले यांनी मानले. कार्यक्रमाला अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. मंगेश भोसले, प्रा. राजा जगताप, डॉ. सी. आर. दापके आदींसह विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

मानवतेची पूजा करणारे व्यक्तिमत्त्व प्राचार्य डॉ. संदीप देशमुख म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवतेची पूजा करणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या मते जात ही एक धारणा असून, ती मनाची एक अवस्था आहे. अज्ञानाने भीती निर्माण होते, भीतीने अंधविश्वास जन्म होतो, अंधविश्वासाने अंधश्रद्धा निर्माण होत असते, अंधश्रद्धेमुळे माणसाचा विवेक शून्य होतो आणि माणूस मानसिक गुलाम होतो हा विचार समाजाने समजून घेण्याची गरज प्राचार्य देशमुख यांनी या वेळी व्यक्त केली.

# परंड्यात पारा १३ अंशावर, मागील वर्षीपेक्षा थंडीत वाढ



परंडा(प्रतिनिधी)-तालुक्यासह शहरात मागील वर्षी थंडीने फारसे दर्शन दिले नव्हते. परंतु यंदाच्या हिवाळ्यात थंडीने हजेरी लावली असून, शेकोटी पेटवत निवडणुकीसंदर्भात राजकीय गप्पा रंगत आहेत.

तालुक्यात ६ व ७ डिसेंबरला पहाटे तापमान तब्बल १३ अंश डिग्री सेल्सिअसपर्यंत घसरत्यामुळे चौकात, गल्लीबोळांत शेकोट्या पेटताना दिसत आहेत. या शेकोट्यांमुळे थंडीपासून सुटका तर होतेच. पण त्या माध्यमातून राजकीय गप्पा पुन्हा रंगू लागल्या आहेत. पूर्वीच्या काळात हिवाळा खूपच कडक असायचा. त्यावेळी मोठ्या प्रमाणात शेकोट्या केल्या जात होत्या. शेतकरी जीवनातील कष्टांमध्ये ऊब, आधार आणि एकत्रित जगण्याचा संदेश संदेश शेकोटी देत राहिली आहे. त्यामुळे हा शब्द फक्त आगीचा नव्हे; तर जीवनमूल्यांचा उबदार वारसा आहे.

गल्लोगल्ली शेकोट्या पेटवल्या जात आहेत. दि. २ डिसेंबर रोजी झालेल्या नगराध्यक्ष, नगरवसेवकांच्या निवडणुकीत कोण विजयी होणार? कोणी -कोणाचे पंख कापणार याची गरमागरम चर्चा सुरू आहे.

मागील चार दिवसांपासून १४ अंशाच्या खालीच पारा मागील चार दिवसांत तालुक्यातील तापमानात घट होण्यास सुरुवात झाली. ४ डिसेंबर रोजी किमान तापमान १४ अंश सेल्सिअस, ५ डिसेंबर रोजी १३ अंश सेल्सिअस तर ६ डिसेंबर रोजी वातावरणात बदल होऊन तापमान १२ अंशापर्यंत खाली आहे. तर ७ डिसेंबर रोजी किमान तापमान १३ अंश होते. सर्दी खोकला व तापाचे रुग्ण वाढत असल्याने रुग्णालयात रुग्णाची गर्दी वाढत आहे.

# तापमानात घट, मात्र ऊर्जा देणाऱ्या सुकामेवा खरेदीत वाढ

धाराशिव (प्रतिनिधी)-उत्तरेकडील थंड वाऱ्यामुळे राज्यभरात पारा खाली सरकत आहे. मागील महिनाभरापासून किमान पारा २० अंशाच्या खालीच आहे. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच धाराशिव शहरासह जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढला आहे. यंदा गतवर्षीपेक्षा ड्रायफ्रूटच्या दरात फार मोठी वाढ झाली नसली तरी सरासरी १० टक्क्यांची वाढ आहे. थंडीची चाहूल लागताच रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त अशा पौष्टिक डिंक लाडूसाठी सुकामेवा खरेदी करत आहेत. धाराशिव शहरातील विविध सुकामेव्यासह विविध हॉटेलमध्ये डिंकलाडू व अन्य खाद्यपदार्थ खरेदीतून दररोज २५ ते ३० लाखांची उलाढाल होत आहे. थंडीत शरीराला गरम, उबदारपणा देणारे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याऱ्या काजू, बदाम, खारिक, पिस्ता, अक्रोडसह मणूके, खारीक, खोबरे, शेंगदाणे खरेदी करत आहेत. सुका मेव्यात ग्राहकांची सर्वाधिक पसंती काजू, बदाम, खारिक, आक्रोडला दिसत आहे. खोबरे, किसमिसच्या दरात वाढ झाली आहे. मागील वर्षी २०० ते २५० रुपये किलो असलेले खोबरे यंदा ३५० ते ४०० रुपयांवर पोहोचले आहे. मागील वर्षी दिवाळीसह डिसेंबर महिन्यात ३०० रुपये किलोने खोबरे विक्री होत होते. केंद्र सरकारने ऐन दिवाळीपूर्वी सुकामेव्यावरील जीएसटी ५ टक्क्यांवर आणल्याने काजू, बदाम, खारीक, अक्रोड, पिस्ताचे दर गेल्या वर्षीच्या तुलनेत किलोमागे ५० रुपयांपासून ते २०० रुपयांपर्यंत कमी झाले त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला परवत आहेत. हिवाळ्यात प्रकृती चांगली राहावी यासाठी अनेकजण तयार डिंकलाडूही खरेदी करत आहेत. सध्या ८०० रुपये किलोन विक्री होत आहेत. तर अनेक गृहिणी घरच्या घरी डिंकलाडू बनवण्यासाठी काजू, बदामसह डिंक व अन्य सुकामेवा खरेदी करताना दिसत आहेत.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **QUADRI SAYED MAHMOOD MOINODDIN.**
TO **SYED MAHMOOD MOINODDIN QUADRI**.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SYED MAHMOOD MOINODDIN QUADRI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **QUADRI SAYED MAHMOOD MOINODDIN.**
NEW NAME:- **SYED MAHMOOD MOINODDIN QUADRI.**
Address :- NEAR NAGAR VACHNALAY, MARWAD GALLI,OSNANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 952919570337 Mob. No.-9422377787


# महापरिनिर्वाण दिनी रक्तदान करून बाबासाहेबांना अभिवादन

# प्रसेना प्रतिष्ठानचा १७ वर्षांपासून अखंडित उपक्रम

धाराशिव (प्रतिनिधी)- शहरातील प्रसेना प्रतिष्ठानच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून अभिवादन केले. शहरातील प्रसेना प्रतिष्ठानच्या वतीने मागील १७ वर्षांपासून महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी शनिवार ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे ,मैनुद्दीन पठाण, युवक शहर कार्याध्यक्ष संदीप बनसोडे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ.उज्ज्वला गवळी,नेहा संदीप बनसोडे ,गणेश वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. या रक्तदान शिबिरात दिवसभरात ७२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रतिष्ठानच्या वतीने चहा, फळे व नाष्टा देण्यात आला.



यावेळी जिल्हा रक्तपेढीच्या रक्तसंक्रमण कर्मचारी दिवसभर उपस्थित होते. हे रक्तदान शिबीर प्रसेना प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी सामाजिक नेते निखिल बनसोडे, अमोल बनसोडे,शाहू धावारे,दादासाहेब मोटे, प्रसाद माने, प्रजोत बनसोडे, स्वप्नील बनसोडे, सुमित क्षीरसागर,नागराज साबळे ,शैलेंद्र शिंगाडे,प्रसाद बनसोडे, रुपेश बनसोडे,क्षमीनल सरवदे,महेश डावरे, कुमार ओहळ,रिया गायकवाड,रेणुका बनसोडे,लक्ष्मी ढाले, आदींनी परिश्रम घेतले.

# ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन प्राथमिकशाळा भाटशिरपुरा येथे संपन्न



कळंब (प्रतिनिधी)- तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपुरा शाळेमध्ये दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान, गणित, पर्यावरण चे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद चे शिक्षणाधिकारी प्राथमिक मा.नागेश मापारी , गटविकास अधिकारी मा.सोपान अकेले , गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे उपशिक्षणाधिकारी संतोष माळी विस्ताराधिकारी सुशील फुलारी, संभाजी जगदाळे यांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

या प्रदर्शनाचे प्रास्ताविक- कळंब पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा. धर्मराज काळमाते यांनी केले तर स्वागतपर मनोगत जिल्हा परिषद भाटशिरपूरा शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे यांनी केले .या प्रदर्शनामध्ये कळंब तालुक्यातील बहुसंख्य शाळेने भाग घेतला होता या मध्ये पहिली ते आठवी प्राथमिक विद्यार्थी प्रयोग सहभाग ७९ शाळेने सहभाग घेतला तर चार शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य सहभाग घेतला व माध्यमिक विद्यार्थी प्रयोग ३५ शाळेने सहभाग घेतला तर चार माध्यमिक शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य सहभाग घेतला.

एकूण ११४ विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात प्रयोग सादर केले तर आठ शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य सहभाग घेतले या वेळी उपस्थित मान्यवर सरपंच सुनीता वाघमारे, उपसरपंच सूर्यकांत खापे , भक्तराज दिवाने ,प्रशांत घुटे, महादेव मेनकुदळे व कळंब तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी भाटशिरपुरा सचिन तामाने, अमोल बाभले, नागेंद्र होसाळे, राजाभाऊ शिंदे, लिंबराज सुरवसे, कालींदा मुंडे राजकन्या तोडकर, गणपत तपिसे यांनी परिश्रम घेतले. या विज्ञान प्रदर्शनास तालुक्यातील शिक्षक व विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत तांबारे तर आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी संतोष माळी यांनी केले.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


# आष्टामोड उड्डाणपुलाचे काम ५ वर्षांपासून बंद; नागरिकांना त्रास

लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा तालुक्यातील आष्टामोड येथील उड्डाणपुलाचे काम पाच वर्षांपासून रखडले आहे. काम सुरू असलेल्या ठिकाणी दोन्ही बाजूला पडलेली खडी आणि खड्ड्यांमुळे वाहनधारकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी अनेक अपघात झाले आहेत. मात्र या उड्डाणपुलाला मुहूर्त मिळेना. याच महामार्गावरील जवळपास सर्वच उड्डाणपुलांची कामे पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुलेही झाले आहेत. परंतु आष्टा मोड पुलाचे काम २०२० मध्ये बंद झालेले काम अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे वाहनधारकांची तारांबळ होत आहे.

सोलापूर-हैदराबाद या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ चे काम साधारणतः २०१४ मध्ये हाती घेण्यात आले होते. परंतु काम सुरू झाल्यावर या ना त्या कारणाने हे काम कासवगतीने सुरू होते. अनेक कंत्राटदार काम अर्धवट सोडून गेले. त्याची कारणे अद्याप समजली नाहीत. अशा परिस्थितीत मागील वर्षी याच महामार्गावरील उमरगा तालुक्यातील येणेगूर, मुरूम मोड, दाळिंब येथील उड्डाणपुलाची कामे पूर्ण झाली. ते सुरूही झाले. पण आष्टा मोड येथील पुलाचे काम अद्याप रखडलेलेच आहे. या महामार्गावरून वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यात अवजड वाहने तर मोठ्या प्रमाणात असतात. याठिकाणी उड्डाणपूल तयार नसल्याने ही वाहने उड्डाणपुलाच्या बाजूच्या रस्त्यावरून जातात. त्यामुळे याठिकाणी थांबलेल्या प्रवाशांना मोठ्या प्रमाणात धुळीचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी असलेली हॉटेल्स, फळविक्रेते, विविध खाद्यपदार्थ दुकानदार तर वैतागून गेली आहेत. या ठिकाणी दोन्ही बाजूच्या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ-मोठी खड्डे पडले आहेत. त्यामुळे आठवड्यातून किमान दोन अपघात होत असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले. एखादा ठिकाणी महामार्ग करत असताना त्या महामार्गाचे काम पूर्ण झाल्याशिवाय वाहनचालकांकडून टोलवसुली केली जात नाही हा नियम आहे. पण मागील दोन वर्षांपासून या महामार्गावरील तलमोड व फुलवाडी या दोन ठिकाणी टोलवसुली सुरू आहे. या पुलाच्या कामाला सुरुवात होऊन आता जवळपास अकरा वर्षे होत आहेत. त्यामुळे सध्या याठिकाणी झालेल्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत. या ठिकाणी उड्डाणपुलाचा फक्त सांगाडा दिसून येत आहे. एकूण सहा पिलर उभारले गेले आहेत. तसेच काही दिवसांपूर्वी थोडे फार काम सुरू झाले होते. या उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात काटेरी झुडुपे उगवली आहेत. अपघाताचे प्रमाण वाढले या ठिकाणी उड्डाणपुल नसल्याने सर्व दुचाकी, चारचाकी, अवजड वाहने सर्व्हिस रोडवरून जातात. या रस्त्यावर दोन्ही बाजूला मोठं मोठी खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. दर आठवड्यात एक दोन तरी दुचाकी या खड्ड्यामध्ये जाऊन अपघात होत असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले.

धुळीमुळे वाहनांसाठी थांबलेल्या प्रवाशांना होतोय त्रास याठिकाणी विविध गावाहून सोलापूर, पुणे, उमरगा हैदराबाद याठिकाणी जाणारे शेकडो प्रवासी दररोज बसची वाट पाहत थांबत असतात. परंतु याठिकाणी वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असते. याचा प्रवाशांसह वाहनचालकांना

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649

